# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापण मंडळ )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० E-mail Id – coegondwana@gmail.com


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/२१५५/२०२० दि. २०/०६/२०२०

## अधिसुचना

### शैक्षणिक सत्र २०१९–२० मधील अंतिम सत्र/वर्षाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांचे नियोजन करण्याबाबत.

संदर्भः– १)मा. उच्च शिक्षण संचालक,पुणे यांचे शासन पत्र क्र. संकीर्ण युएनआय/४१३१,दि. ०८ मे २०२०
२)विद्यापीठाचे परीपत्रक क्र. जा.क्र गो.वि/परीक्षा वि. /१९८३/२०२० दि.१९मे, २०२०
३)मा. उच्च शिक्षण संचालक,पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/२०२०बैठक विशी–१/४४४५,दि.१९जून २०२०
४)उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र १२३/विशि–३, मंत्रालय मुंबई–३२ दि.१९ जून २०२०

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये विद्यापीठाने परीक्षेसंदर्भात मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत व त्यानुसार महाविद्यालयांना कार्यवाही घेण्याचे सुचित केलेले आहे. मात्र संदर्भ क्र. ४ नुसार प्राप्त परीस्थितीत, या शिफारशीनुसार अंतिम सत्राच्या/ अंतिम वर्षाच्या परीक्षांचे आयोजन करण्याबावत प्रभावी उपाययोजना करून निर्णय घेण्यासंदर्भात सुचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे संदर्भ क्र. २ च्या परीपत्रकातील अनुक्रमांक ४ ची शिफारस याद्वारे रद्द करण्यात येत आहे. व या संदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत असून त्यानुसार पुढिल कार्यवाही घ्यावयाची आहे.

**(अ) अव्यावसाईक (पारंपारीक अभ्यासक्रम)**

१. मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या ज्या अंतिम सत्रातील/ वर्षातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास त्यांचेकडून प्रत्येक महाविद्यालयाने संलग्नित प्रपत्र–'अ' नुसार लेखी स्वरूपात भरून घेवून विद्यापीठाकडे दि. ३० जून २०२० पुर्वी सादर करावे, जेणे करून विद्यापीठाद्वारे त्यांच्या मागील सर्व सत्रांच्या गुणांचे सरासरी गुण देवून निकाल लावण्याची कार्यवाही विद्यापीठाद्वारे घेतल्या जाईल. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या स्तरावरून विद्यार्थ्यांना यासंदर्भात सुचित करून आवश्यक ती कार्यवाही घ्यावयाची आहे. एखादा विद्यार्थी सुचनेअभावी पदवीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत प्राचार्य व महाविद्यालय प्रशासनाची राहील.

२. मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या अंतिम सत्रातील/ वर्षातील ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची ईच्छा असेल अशा सर्व विद्यार्थ्यांकडून ३० जून २०२० पुर्वी संलग्नित प्रपत्र–'ब' नुसार माहिती भरून घेतल्यास त्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येईल. अशा सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती निवारण प्राधिकरण गडचिरोली व चंद्रपूर यांचेशी विचार विनीमय करून लवकरच जाहीर केल्या जाईल.

**(ब) व्यावसाईक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, फॉर्मसी, व्यवस्थापन शास्त्र, संगणकशास्त्र, विधि, शारिरीक शिक्षण, अध्यापन शास्त्र)**

१. राज्यातील कोव्हीड–१९ ची परीस्थिती विचारात घेवून व संबंधित व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या संबंधित शिखर संस्थेद्वारे परीक्षा घेण्याच्या किंवा न घेण्याच्या संदर्भात निर्देश प्राप्त झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांसाठी सुचना निर्गमीत करण्यात येईल व त्यानुसार पुढील परीक्षासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

सहपत्रः—१)प्रपत्र—'अ'

२)प्रपत्र—'ब'

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

टिप: प्रपत्र—'अ' व प्रपत्र—'ब' विद्यार्थ्यांच्या login id वर व महाविद्यालयास उपलब्ध केलेले असून सदर प्रपत्र भरून त्याची सारांश प्रत्येक महाविद्यालयाने ३० जून २०२० पुर्वी विद्यापीठाकडे gopniyagug@gmail.com या ईमेल वर पाठवावे.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**
**परीक्षा व मुल्यमापण मडंळ**

**प्रपत्र–अ**

मी (विद्यार्थ्याचे नाव)------------------------------------------------------------------------------

महाविद्यालयाचे नाव-------------------- येथे---------------------या अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक सत्र २०१९–२० मध्ये अंतीम सत्रामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून शिकत असून माझा वैठक क्रमांक--------------- व पीआरएन क्र.--------------------------------------------- आहे.

मी मागील सर्व सत्रातील सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असून सद्यस्थितीत कोव्हीड–१९ मुळे निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे आरोग्य विषयक जोखमीची मला जाणीव आहे. त्यामुळे परीक्षा न देता मागील संपुर्ण सत्रात मिळालेल्या गुणांच्या आधारे मला पदवी प्रदान करण्यात यावी.

यासंदर्भात सर्व बाबीचा मी परीपुर्ण विचार केलेला असून भविष्यात याबाबत काही समस्या उदभवल्यास मी स्वत: जबाबदार राहील.

विद्यार्थ्याचा सध्याचा पुर्ण पत्ता

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

टिप:१) सदर प्रपत्र ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने भरून विद्यार्थ्याने शिकत असलेल्या महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावे.

२) एकदा भरलेले प्रपत्र कोणत्याही परिस्थितीत बदलविता येणार नाही यांची नोंद घ्यावी.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## परीक्षा व मुल्यमापण मडंळ

### प्रपत्र—ब

मी (विद्यार्थ्याचे नाव)———————————————————————————————————————————या महाविद्यालयाचे नाव——————————————————————————येथे———————————————— अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक सत्र २०१९—२० मध्ये अंतीम सत्रामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून शिकत असून माझा बैठक क्रमांक——————— व पीआरएन क्र.———————————————————— आहे.

मी मागील सर्व सत्रातील सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असून सद्यस्थितीत कोव्हीड—१९ मुळे निर्माण झालेल्या परीस्थितीमुळे आरोग्य विषयक जोखमीची मला जाणीव आहे. मात्र मला माझ्या पुढिल भविष्याचा विचार करून अंतीम सत्राची परीक्षा दयावयाची आहे.

यासंदर्भात सर्व बाबीचा मी परीपुर्ण विचार केलेला असून भविष्यात याबाबत काही समस्या उदभवल्यास मी स्वत: जबाबदार राहील.

विद्यार्थ्याचा सध्याचा पुर्ण पत्ता

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

टिप:१) सदर प्रपत्र ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने भरून विद्यार्थ्याने शिकत असलेल्या महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावे.

२) एकदा भरलेले प्रपत्र कोणत्याही परिस्थितीत बदलविता येणार नाही यांची नोंद घ्यावी.